## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

## विद्यापीठ उद्यान अंतर्गत असणाऱ्या आवळा फळांचा जाहीर लिलाव.

## परिपत्रक

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरातील विद्यापीठ उद्यान अंतर्गत असणाऱ्या आवळा फळांचा जाहीर लिलाव आहे त्या स्थितीत करण्याचे निश्चित केले आहे.

दि.१८/०८/२०२५ रोजी आवळा फळझाडांच्या फळांचा जाहीर लिलाव दुपारी १२:३० वाजता विद्यापीठ उद्यान कार्यालय येथे होणार आहे.

तरी ज्यांना सदरील जाहीर लिलावात सहभाग घ्यावयाचा असेल त्यांनी लिलावापुर्वी आवळा फळांच्या बोलीकरीता अनामत रक्कम रू.१०००/- (अक्षरी :- एक हजार रूपये) लेखा विभागामध्ये रोखीने/ऑनलाईन पद्धतीने भरून पावती सोबत आधार कार्डची छायांकीत प्रत जोडून विद्यापीठ उद्यान विभागात जमा करावी. पावती जमा केल्याशिवाय जाहीर लिलावात सहभागी होता येणार नाही.

जाहीर लिलावातील अटी व नियम सोबत जोडले आहे.

संदर्भ क्र.विद्यापीठ उद्यान/आवळा फळबाग लिलाव/२०२५-२६/165 To 245,
दि.12/08/2025,

कुलसचिव

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

## विद्यापीठ उद्यान अंतर्गत असणाऱ्या आवळा फळांचा जाहीर लिलाव

### लिलावाच्या अटी व नियम खालील प्रमाणे आहेत.

१) विद्यापीठ परिसरातील आवळा फळांच्या जाहीर लिलावात भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रू.१०००/- लेखा विभागात भरावी लागेल.

२) महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना जाहीर लिलावात भाग घेता येणार नाही.

३) भरलेली अनामत रक्कम ची पावती व सोबत आधर कार्डची छायांकीत प्रत दाखविल्याशिवाय बोली बोलता येणार नाही व लिलावात भाग घेता येणार नाही.

४) लिलावास प्रारंभ करताना कमीत कमी रू.१०,०००/- पासून बोलीस प्रारंभ करावा ही बोली रू.१०००/- च्या पटीत असावी.

५) जाहीर लिलावात ज्यांची बोली मान्य होईल त्यांना फळझाडांची देखाभाल व संरक्षण स्वतःकरावे लागेल. लिलाव घेतल्यानंतर फळांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही व लिलावात भरलेली पुर्ण रक्कम कोणत्याही सबबीखाली परत केली जाणार नाही.

६) जाहीर लिलावातील बोलीची पूर्ण रक्कम व आवळा फळझाडांची सुरक्षा ठेव म्हणून रू.५०००/- अगोदर लेखा विभागाकडे ऑनलाईन पध्दतीने जमा करावी लागेल. त्यानंतरच फळझाडांचा ताबा देण्यात येईल.

७) प्रथम बोलीधारकाने लिलावातील बोलीची रक्कम भरे पर्यंत दृतीय बोलीधाकाची अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

८) प्रथम बोली धारकाने निर्धारीत वेळेत लिलावात निश्चित झालेली रक्कम न भरल्यास प्रथम क्रमांक बोली धारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. त्यानंतर दृतीय बोलीधारकाला जाहीर लिलाव देण्यात येईल. दृतीय बोलीधारकाने दिलेल्या वेळेत लिलावातील रक्कम न भरल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करून विद्यापीठ नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

९) झाडांना काही इजा पोहचल्यास किंवा झाडांचे काही नुकसान झाल्यास सुरक्षा रक्कम रू.५०००/- कपात केली जाईल.

१०) आवळा फळे संपल्यानंतर भरलेली अनामत रक्कम १०००+५००० असे एकुण रू.६०००/- कक्षअधिकारी (उद्यान) विद्यापीठ उद्यान यांचा अभिप्राय मिळाल्याशिवाय पैसे परत मिळणार नाही.

११) अनामत रक्कम व सुरक्षा रक्कम केवळ धनादेश/RTGS द्वारेच परत केली जाईल.

१२) शेतीमध्ये इतर पीके घेता येणार नाही. पीके घेतल्यास कारवाई केली जाईल. विद्यापीठ परिसरात बाहेरील फळे आणून विकता येणार नाही व विद्यापीठ परिसरात स्टॉल लावून फळे विक्री करण्यासाठी मा.कुलसचिव यांची परवानगी घ्यावी लागेल.

१३) ज्यांनी आवळा फळांचा लिलाव घेतला त्यांचा कालावधी हा घेतलेल्या कालावधीपासून मालाचा उठाव करेपर्यंत किंवा डिसेंबर २०२५ पर्यंत राहील अथवा सद्याचा एकच फळ बहार राहील, ही अट बंधनकारक असेल.

१४) लिलावातील बोलीची अपेक्षित किंमत न मिळाल्यास ती मान्य अथवा अमान्य करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

कुलसचिव